# दरोडा/जबरी चोरी

| पोलीस ठाणे- | गुरनं- / | तपासी अंमलदार- |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १. | दरोडयाचे गुन्हे शाबीत करावयाचे मुद्दे | १. पाच किंवा त्या पेक्षा जास्त लोक एकत्रीत येवून गुन्हा करतात.<br>२. त्यांचेशिवाय एक किंवा अनेक जबरी चोरी करतील किंवा प्रयत्न करतील<br>३. त्यांचेशिवाय जे जादा हजर असतील ते त्यांच्यात मिळतील किंवा जबरी चोरी करतील |

- **दरोडा व जबरी चोरी चे गुन्हे नोंदविण्यापुर्वी व नंतर तपास करीत असताना विचारात घ्यावयाचे मुद्दे** *

| मुद्दा क्र. | तपास कामाची माहिती | उ.वि.पो.अ | अपर पो.अ |
|---|---|---|---|
| १. | प्राप्त खबरीची नोंद ठाणे दैनंदिनीत घ्यावी. | | |
| २. | नोंद खबरीमध्ये संशईत इसमाचे नांव,उपनांव,वय,वर्ण,शरीरयष्टी,अंगात घातलेल्या कपडयाचे वर्णन,पायातील वहाणाचा प्रकार इ. वर्णन घ्यावे. | | |
| ३. | गुन्हेगारांनी गुन्हा करताना वाहन वापरले होते काय? असल्यास,कोणत्या प्रकारचे वाहन वापरले ? वाहनांची संख्या ? याबाबतची माहीती घ्यावी. | | |
| ४. | गुन्हेगारांनी गुन्हयाच्यावेळी हत्यार वापरलेल्या हत्याराचे वर्णन घ्यावे. | | |
| ५. | गुन्हेगारांनी फिर्यादीस अगर साक्षीदारास दमदाटी अगर मारहाण केली आहे का ? असल्यास, त्यांची बोली भाषा व गुन्हेगाराचे वर्णन याबाबतची माहीती घ्यावी. | | |
| ६. | फिर्यादी अगर साक्षीदाराने आरोपीस पाहिले असल्यास माहीती घ्यावी. | | |
| ७. | गुन्हा घडतेवेळी आरोपीस फिर्यादी व साक्षीदार यांनी ओळखले असल्यास माहीती घ्यावी. | | |
| ८. | गुन्हयाचेवेळी गुन्हेगारावर साक्षीदारांपैकी कोणी प्रतिहल्ला केला असल्यास त्यापैकी कोणी जखमी झाले असल्यास माहीती घ्यावी. | | |
| ९. | गुन्हयाचेवेळी गुन्हेगारांच्या वस्तू घटनास्थळी राहिल्या आहेत अगर कसे याची खात्री करावी. | | |
| १०. | फिर्यादीस गुन्हयाच्या जागी गुन्हेगारांची चाहूल लागली असल्यास माहीती घ्यावी. | | |
| ११. | फिर्यादीच्या घरी गुन्हयाचे वेळी इतर साक्षीदार निष्पण्ण झालेस, सदरवेळी ते काय करत होते याची माहीती घ्यावी. | | |
| १२. | घरामध्ये दिवा लावलेला होता का?तो नेहमी लावलेला असतो का ? याची माहीती घ्यावी. | | |
| १३. | चोरटयांची संख्या किती होती? किती चोरटयांनी घेरले होते?याची माहीती घ्यावी. | | |
| १४. | घटनास्थळी लोक मदतीस आले असल्यास माहीती घ्यावी. | | |
| १५. | चोरटयांची व मदतीस आलेल्या लोकांची झटापट झाली असल्यास माहीती | | |

| तयार केले | | अधिकृत केले |
|---|---|---|
| | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | घ्यावी. | | |
| १६. | गुन्हेगार आलेल्याच मार्गाने गेले का?अथवा अन्य मार्गाने गेले,याबाबतची माहीती घ्यावी. | | |
| १७. | गुन्हेगारांचा शोध घेण्यासाठी पोलीस पथक विनाविलंब पाठवावे. | | |
| १८. | सदर बाबत वरिष्ठांना वायरलेसव्दारे अगर फोनव्दारे त्वरीत माहिती कळवावी. | | |
| १९. | गुन्हयाच्या संदर्भात विनाविलंब पोलीस यंत्रणेव्दारे (वायरलेस व अन्य माध्यम) आजुबाजुचे पोलीस ठाणेना कळवावे. | | |
| २०. | फिर्यादी अगर साक्षीदार यांना गुन्हेगारांनी केले मारहाणीबाबत मेडिकल तपासणीसाठी त्वरीत पाठवावे. | | |
| २१. | जखमींना ज्याचेसोबत औषधोपचारासाठी पाठविले त्यासंबंधी स्टेशन डायरीत नोंद घ्यावी. | | |
| २२. | जरुरीप्रमाणे गुन्हयाचे जागी डॉग स्कॉड,फिंगर प्रिंट एक्सपर्ट,फोटोग्राफर यांना पाचारण करावे. | | |
| २३. | घटनास्थळी जाताना क्राईम बॉक्स सोबत नेऊन वापरणेत यावा. | | |
| २४. | गुन्हयाच्या ठिकाणी लायक पंचाना बोलावून उघडया डोळयानी पहाणी करावी. | | |
| २५. | घटनास्थळी लाईटची योग्य व्यवस्था करावी. | | |
| २६. | घटनास्थळाचे फोटो घेणेत यावेत. | | |
| २७. | घटनास्थळी इतर कोणी वस्तू हाताळणार नाहीत याची दक्षता घ्यावी. | | |
| २८. | घटनास्थळाचे निरीक्षण करताना पंचासमक्ष घडयाळयाच्या काटयाच्या दिशेने अथवा विरुध्द दिशेने करुन तपशीलवार पंचनामा करण्यात यावा. | | |
| २९. | घटनास्थळी पंचनामा करताना चान्स प्रिंट,रक्त,चप्पल,रुमाल,विडीसिगारेट, इ. आरोपींनी हाताळलेल्या/पडलेल्या वस्तू मिळून आल्या असल्यास ताब्यात घ्याव्यात. | | |
| ३०. | घटनास्थळी मिळून आलेल्या वस्तू आरोपीच्या आहेत काय? याची खात्री करुन श्वानपथक मागविणेत यावे. | | |
| ३१. | घटनास्थळी झालेल्या हल्ला/प्रतिहल्यात जखमींना मेडीकल ऑफिसर यांचेकडे पाठविण्यात येवून जखमांबाबतचे मेडिकल सर्टीफीकेट सत्वर मिळवण्यात यावे | | |
| ३२. | घटनास्थळी रक्त,रक्त मिश्रीत माती,वस्तू,हत्यार,फिंगर प्रिंट या सविस्तर पंचनामा करुन पंचासमक्ष ताब्यात घ्याव्यात. | | |
| ३३. | पंचनामा करताना सराईत पंच न घेता प्रतिष्ठित /आब्रुदार पंच घ्यावेत. | | |
| ३४. | पंचनामा करताना आवश्यक्तेनुसार दुभाषी वापरण्यात यावा. | | |
| ३५. | पंचाना पंचनामा/जबाब वाचून दाखवून त्यावर स्वाक्षरी घेण्यात यावी. | | |
| ३६. | फिर्यादीची फिर्याद घेताना दुभाषी वापरण्यात यावा. (मराठी येत नसल्यास) | | |
| ३७. | फिर्यादीस त्याची घेतलेली फिर्याद वाचून दाखवून स्वाक्षरी घेण्यात यावी. | | |

| | | | |
|---|---|---|---|
| ३८. | गुन्हेगारी पार्श्वभुमी असणारे इसमांना पंच म्हणून घेण्यात येवू नये. | | |
| ३९. | पंचनाम्यात जप्त करण्यात आलेल्या वस्तूंचे सविस्तर वर्णन घेण्यात यावे. | | |
| ४०. | घटना घडत असताना आरडा-ओरडा झाला असल्यास कोणी मदतीस आले होते काय ? त्यांनी मदत केली होती का? याबाबतची माहीती घ्यावी. | | |
| ४१. | घटना स्थळी जप्त करुन ताब्यात घेतलेल्या वस्तुंना सील करणेत यावे. | | |
| ४२. | जप्त करुन ताब्यात घेतेलेल्या वस्तू कारकूनकडे जमा करुन त्याची मुद्देमाल पावती घेवून गुन्हयाच्या कागदपत्रात समाविष्ठ करावी. | | |
| ४३. | गुन्हेगार हे ज्या मार्गाने जाण्याची शक्यता आहे त्या मार्गावरील रेल्वे स्टेशन,एस.टी. स्टँड, टॅक्सी/रिक्षा स्टँड, धर्मशाळा या ठिकाणी शोध घेणेत यावा. | | |
| ४४. | आसपासचे पो.ठाणेंना वायरलेस यंत्रणा अगर फोन द्वारे तात्काळ कळविणेत यावे. | | |
| ४५. | भटकणाऱ्या टोळयांची माहिती घेऊन त्यांची झडती घ्यावी. | | |
| ४६. | शिंपी, सोनार, घाणवट माल घेणारे, स्थानिक सराईत व माहितगार संशईत यांची माहिती काढून त्यांच्यावर छापे टाकून झडत्या घ्याव्यात. | | |
| ४७. | घरझडतीत संशयास्पद माल मिळाला तर तो जप्त करुन फिर्यादी व साक्षीदार यांचेकडून ओळखून घ्यावा. | | |
| ४८. | घटनास्थळाचे आजुबाजुस मोठे धरण, रस्त्याचे काम अगर इमारतीचे काम चालु असल्यास तेथील मजुरांची चौकशी करावी. | | |
| ४९. | गुन्हा घडला त्यादिवशी अगर त्यापूर्वी कोर्टात अट्टल गुन्हेगार किंवा त्याचा साथीदार कोर्टामध्ये साक्षीसाठी आला होता काय? याची खात्री करावी. | | |
| ५०. | गुन्हा घडणेपूर्वी कोणी संशईत टेहळणीसाठी वरचेवर त्या भागात येत होता काय ? याची चौकशी करावी. | | |
| ५१. | गुन्हा घडणेपूर्वी व नंतर गुन्हेगार एकत्र कसे आले व कोठे गेले? याचा तपास श्वान पथक अथवा मागाडे यांच्याव्दारे काढून माहीती हस्तगत करावी. | | |
| ५२. | दारुचे गुत्ते,जुगाराचे अड्डे,लॉजींगबोर्डींग,वेश्यागृहे, करमणूकीची केंद्रे, पानपट्टीची दुकाने या ठिकाणी संशईत इसम आले होते काय ? याबाबत तपास करावा. | | |
| ५३. | नुकताच तुरुंगातून अशा प्रकारचे गुन्हे करणारा गुन्हेगार सुटला आहे काय? याची कोर्टातून खात्री करावी. | | |
| ५४. | गुन्हयात महिला आरोपी असल्यास स्त्री पंचाकडून तीची झडती घेणेत यावी. | | |
| ५५. | गुन्हयांत आरोपी अटक असलेस त्याचेकडे विचारपूस करुन निष्पन्न झालेल्या इतर गुन्हेगारांना अटक केली आहे काय? अगर त्यांची झडती घेतली आहे काय ? तसेच त्यांच्या हालचाली तपासल्या आहेत काय ? याची खात्री करावी. | | |
| ५६. | निवेदन पंचनामा करताना प्रत्येक वस्तू ही एकत्रित सील न करता वेगवेगळी | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | सीलबंद करणेत यावी. | | |
| ५७. | जप्त वस्तू हया कोणत्या ठिकाणाहून जप्त करण्यात आल्या हे तपशीलवार, सुसंगतपणे पंचनाम्यात लिहिण्यात आले असलेची खात्री करावी. | | |
| ५८. | जप्त करणेत आलेला माल सी.ए. अगर संबंधीत तज्ञाकडे अभिप्रायासाठी पाठविणेत यावा. | | |
| ५९. | जप्त माल तपासणीस पाठविणेत आला असल्यास त्याची स्थळप्रत कागदपत्रात समाविष्ठ करावी. | | |
| ६०. | सी. ए. तपासणीसाठी घेवून गेलेल्या पोलीस कर्मचाऱ्याचे तपास टिपण कागदपत्रात समाविष्ट करावे. | | |
| ६१. | गुन्हयांतील साक्षीदार व पंचाचे पुर्ण पत्ते, पुर्ण नांव,फोन नंबर घेणेत यावेत. | | |
| ६२. | फिर्यादी व साक्षीदार यांनी गुन्हेगारांना गुन्हा करताना पाहिले असल्यास त्यांची ओळख परेड घ्यावी. | | |
| ६३. | आरोपी अटक करताना सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी करावी. | | |
| ६४. | अटक करणेत आले गुन्हेगाराची पुर्व शिक्षेची मागणी करावी. | | |
| ६५. | अटक आरोपींवर/गुन्हेगारांवर पुर्वी गुन्हे दाखल असलेस सी.आर.पी.सी ७५ हे जादा कलम लावणेत यावे. | | |
| ६६. | तपास पुर्ण झालेनंतर उप विभागीय पोलीस अधिकारी, सहाय्यक संचालक व सरकारी अभियोक्ता यांचेकडून कागदपत्रांची पडताळणी करुन घेवून त्यांचा अभिप्राय घेण्यात यावा. | | |
| ६७. | गुन्हयाचा संपूर्ण तपास झाल्यावर पुराव्याची छाननी करुन आरोपींवर दोषारोप पत्र त्यांच्या अटकेनंतर ९० दिवसांचे आत पाठवावे. | | |
| ६८. | दोषारोप पत्र पाठविताना त्याचे सोबत गुन्हयाचे ठिकाणाचा नकाशा व मुद्येमाल कोर्टात पाठविलेची खात्री करावी. | | |